केंद्र शासनाच्या श्यामा प्रसाद मुखर्जी रुरबन अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीची स्थापना करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एनआरएम-२०१६/प्र.क्र. ०१/योजना-४**

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई-४०० ००१

दिनांक: १४ जानेवारी, २०१६

**प्रस्तावना –**

सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात एकूण ग्रामीण लोकसंख्या ही शहरी लोकसंख्येच्या तुलनेत ६८% आहे. त्यानुसार आजमितीस ग्रामीण भागातील लोकसंख्या एकूण ८३३ दशलक्ष एवढी आहे. सन २००१-२०११ या काळात सुमारे १२% ग्रामीण लोकसंख्येमध्ये वाढ झालेली आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता भारत सरकारने श्यामा प्रसाद मुखर्जी RURBAN अभियान (SPMRM) राबविण्याचे प्रस्तावित केले आहे. सदर अभियानास यापुढे राष्ट्रीय रुरबन मिशन (National Rurban Mission-NRuM) असे संबोधण्यात येणार आहे.

२. “RURBAN” गाव समूह म्हणजे भौगोलिकदृष्ट्या जवळची गावे, या गावांची लोकसंख्या समतल आणि किनारपट्टीच्या भागात सर्वसाधारणपणे २५,००० ते ५०,००० इतकी तसेच वाळवंट, डोंगराळ किंवा आदिवासी भागात सर्वसाधारणपणे ५,००० ते १५,००० इतकी राहील, अशा गावांचा अंतर्भाव त्यामध्ये राहील.

३. सदर अभियानाअंतर्गत विकास हा रुरबन समूहाच्या माध्यमाने करण्यात येईल. यामध्ये संपुर्ण देशातील ग्रामीण भागातील गावांच्या समुहांचा आर्थिक, सामाजिक आणि भौतिक विकास करणे आणि शहराप्रमाणे पायाभूत सुविधा पुरविणे अपेक्षित आहे. यामध्ये कृषी व कृषीशी संलग्न असणाऱ्या क्षेत्रांना विशेष प्राधान्य देणे अपेक्षित आहे. **रुरबन अभियानाची उद्दिष्टे** खालील प्रमाणे आहेत.

१) ग्रामीण व शहरी भागातील विकासाचा असमतोल दूर करणे, यामध्ये प्रामुख्याने आर्थिक व तांत्रिक सोयी सुविधा ग्रामीण भागामध्ये उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे.

२) ग्रामीण भागाचा आर्थिक विकास करतांना, गरीबी व बेरोजगारी कमी करणे.

३) अभियानांतर्गत निवडलेल्या क्षेत्रांचा सर्वांगीण विकास करणे.

४) ग्रामीण भागातील गुंतवणूकीस चालना देणे.

सदरची उद्दिष्टे साध्य करुन या गाव समुहांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाच्या योजना व राज्य शासनाच्या योजना या नियोजनबध्द पध्दतीने, एककेंद्राभिमूख रितीने व विशिष्ट कालमर्यादेत या गाव समुहांमध्ये राबविणे अपेक्षित आहे. ज्या विकासांच्या बाबींसाठी योजना उपलब्ध नाहीत, अशा बाबींसाठी केंद्र शासनाकडून या गाव समुहांना Critical Gap Funding (CGF) अंतर्गत निधी प्राप्त होणार आहे.

४. केंद्र शासनाच्या श्यामा प्रसाद मुखर्जी रुरबन अभियानाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी, या योजनेमध्ये समन्वय साधण्यासंदर्भात आवश्यक निर्णय घेण्यासाठी राज्यस्तरावर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती (State Level Empowered Committee - SLEC) स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

केंद्र शासनाच्या श्यामा प्रसाद मुखर्जी रुरबन अभियानाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता, विभागातील समन्वयाकरीता आणि अभियानाबाबत आवश्यक ते निर्णय घेण्यासाठी व संनियंत्रण करण्यासाठी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीची (State Level Empowered Committee - SLEC) स्थापन करण्यात येत आहे. या समितीची संरचना खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| १ | मा. मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव (नियोजन) | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग) | सदस्य |
| ५ | प्रधान सचिव ( महसूल विभाग) | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव (नगर विकास विभाग-१) | सदस्य |
| ७ | सचिव (आदिवासी विकास विभाग) | सदस्य |
| ८ | उपसचिव (रुरबन) ग्राम विकास विभाग | सदस्य सचिव |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११४१३०२३९५८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

V Giriraj

Digitally signed by V Giriraj
DN: c=IN, o=All India Service, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=V Giriraj
Date: 2016.01.14 13:32:34 +05'30'

**वि. गिरिराज**

प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव
६. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व),
७. मा. विधान सभा/मा. विधान परिषद सदस्य (सर्व)
८. मा. अपर मुख्य सचिव (वित्त/ नियोजन/)
९. मा. प्रधान सचिव/ सचिव (ग्राम विकास/ महसूल/ नगर विकास विभाग-१/आदिवासी विकास/)
१०. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे.
११. विभागीय आयुक्त (सर्व)
१२. जिल्हाधिकारी (सर्व)
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१४. सहसचिव/ उपसचिव, ग्राम विकास विभाग (सर्व)
१५. राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान, पुणे.
१६. निवडनस्ती